१८. सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने इतर कोणत्याही सहकारी संस्थेच्या कारभार पूर्णपणे अथवा अंशत: ताब्यात घेणे अथवा व्यवस्थापन करण्यासाठी घेणे.

१९. सभासदांच्या, बँकेच्या आजी व माजी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पूरक अशा संघटना, संस्था, निधी, विश्वस्त निधी स्थापन करणे, स्थापनेस मदत करणे अथवा त्यात सहभागी होणे तसेच बँकेचे कर्मचारी व माजी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या किंवा संबधीत व्यक्तीस निवृत्तवेतन (पेन्शन) मंजूर करणे. विमा उतरविणे, धर्मादाय व परोपकार करण्याच्या उद्देशाने कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक संस्थांना हमी देणे, वर्गणी देणे अथवा त्यांचे व्यवस्थापन पाहणे, ट्रस्टी म्हणून काम करणे.

२०. सभासदांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विविध योजना करुन कर्जपुरवठा करणे.

२१. लघु व कुटीर उद्योगधंद्यांना अर्थ पुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे व स्वयंरोजगारी उद्योजकास स्वत:चा उद्योगधंदा उभा करण्यास मदत करणे.

२२. जेथे आवश्यक असेल तेथे रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने इतर बँका अथवा संस्था यांच्या "सहभाग योजनेत व भाग घेऊन गरजूंना कर्ज पुरवठा करणे.

२३. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट (सहकारी बँकांस लागू केलेले) १९४९ चे कलम ६(१) अन्वये इतर सर्व व्यवहार करणे.

२४. विविध शासकीय संस्था, निमशासकीय संस्था व कायद्याच्या तरतूदीने अस्तित्वात येणाऱ्या संस्था इत्यादींसाठी अधिकृत प्रतिनिधी संस्था म्हणून निधी जमा करण्याचे काम करणे.

२५. महाराष्ट्र को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी, आयुर्विमा मंडळ, सरकारी/निमसरकारी व इतर आर्थिक संस्था यांचेकडून पुनर्वित्त प्राप्त होईतो, तात्पुरत्या स्वरुपाचा अथवा कायम स्वरुपाचा कर्जपुरवठा सहकारी गृहनिर्माण संस्थांना निबंधक व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या पूर्व परवानगीने करणे.

२६. राज्य सरकारने सुचवल्यानुसार इतर कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय जो सहकारी बँका कायदेशीरपणे करु शकतात असा व्यवसाय करणे.

२७. बँकेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक, सार्वजनिक संस्था, इतर बँका व संलग्न संस्था यांना संगणक प्रणालीच्या आधारे आर्थिक, तांत्रिक कायदेशीर व तद्नुषंगिक सेवा पुरविणे.

२८. विमा कंपन्याबरोबर करार करुन कार्पोरेट/रेफरल पध्दतीनुसार विमा व्यवसाय अंगीकारणे.

२९. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार एक अथवा एकापेक्षा जास्त संलग्न संस्था उभारणेसाठी प्रवर्तक म्हणून काम करणे.

३०. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने क्रेडीट/डेबीट कार्ड व्यवसायामध्ये सहभाग घेणे.

३१. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने मर्चंट बँकींग अथवा डिपॉझीटरी सेवा, डिमॅट सेवा पुरविणे.